# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालय, जिल्हा अमरावती

क्र.प्र.अ./भू.स.अ.का./कावि ५६७ / २०१९ दिनांक :- ४/ ९ /२०१९

## "कलम - ११"

## अधिसूचना

**भुसपांदन प्रकरण क्रमांक ८/४७/२०१७-२०१८, मौजा जैतापूर, ता.भातकूली,जि.अमरावती.**

ज्या अर्थी, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करीता उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ ( २०१३ चा ३०) यांच्या कलम ३ च्या खंड (इ) परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन काढण्यात आलेली अधिसूचना महसुल व वन विभाग क्र. संकीर्ण ११/२०१४/प्र.क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे.) याव्दारे, असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखादया सार्वजनिक प्रयोजनासाठी एखादया जिल्हयातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमिन संपादन करण्याच्या संबधात, अशा जिल्हयाचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या **अमरावती** जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांनी सोबत जोडलेल्या अनुसुची I मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश **"उक्त जमिन"** असा करण्यात आला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी (यात यापुढे ज्याचा निर्देश **उक्त सार्वजनिक प्रयोजन** असा केला आहे) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते. ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसुची दोन मध्ये दिलेले आहे. आणि म्हणून उक्त अधिनियमाचे कलम ११ च्या पोट कलम (१) च्या तरतुदीन्वये याव्दारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, प्रस्तावीत भूमीसंपादनच्या अनुषंगाने बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे या सोबत जोडलेल्या अनुसूचि तीन मध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचिमध्ये कारणे नमुद करावीत.)

आणि ज्या अर्थी, सामाजीक परिणाम निर्धारण सारांश या सोबत जोडलेल्या अनुसूचि चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्या अर्थी, कलम ४३ च्या पोटकलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील या सोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचिमध्ये तपशिल नमुद करावा.)

त्या अर्थी आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती हि अधिसूचना प्रसिध्द दिनांकापासुन ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधी पर्यंत उक्त

जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकारी विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमुद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातुन सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपरस्पर उल्लघंन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकारी कडुन भरपाई दिल्या जाणार नाही.

तसेच उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमीसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २०१४ (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे.) यांच्या नियम १० च्या उपनियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमीअभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पुर्ण करणार असल्याचे देखील घोषीत करण्यात येत आहे.

आणि ज्या अर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी उक्त अधिनियमा खालील जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी **उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) अ.व.प्र.क्र. ४ अमरावती** यांना पदनिर्देशित करीत आहे.

**<u>अनुसूचि - एक</u>**

जमिनीचे वर्णन

गांव ***जैतापुर***, तालुका **भातकूली**, जिल्हा ***अमरावती***

| अ.क्र. | सर्व्हे नंबर /गट नंबर | सं.मो.प्रमाणे क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) | | अ.क्र. | सर्व्हे नंबर /गट नंबर | सं.मो.प्रमाणे क्षेत्र (हेक्टर आर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६/१ अ | ०.११ | | ९ | ३/६ | ०.०३ |
| २ | ६/३ | ०.०७ | | १० | ३/७ | ०.०३ |
| ३ | ६/४ | ०.०५ | | ११ | ५/३ | ०.१३ |
| ४ | ३/१ | ०.०३ | | १२ | ४/१ पै. | ०.०६ |
| ५ | ३/२ | ०.०३ | | १३ | ४/१ पै. | ०.०६ |
| ६ | ३/३ | ०.०३ | | १४ | ४/२ | ०.०६५ |
| ७ | ३/४ | ०.०६ | | १५ | ४/२ अ | ०.०६५ |
| ८ | ३/५ | ०.०३ | | - | - | - |
| | - | - | - | एकुण | - | ०.८५ |

**<u>अनुसुची दोन</u>**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण** :- **निम्न पेढी प्रकल्प.**

**प्रकल्पाचे नांव** :- **निम्न पेढी प्रकल्प.**

**प्रकल्प कार्याचे वर्णन** :- **निम्न पेढी प्रकल्पाच्या पर्यायी रस्ता चेचरवाडी ते भातकूली रा.मा.क्र.३०९ रस्त्याच्या बांधकामाकरीता.**

सामाजिक मिळणारे लाभ :- निम्न पेढी प्रकल्पाच्या पर्यायी वाहतुकीकरीता लाभ

अनुसुची तीन

बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे :- विस्थापनाची आवश्यकता नाही सबब माहिती निरंक

अनुसुची चार

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सांराश)

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारण

सारांश

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ अ महसुल व वन विभाग मुंबई दिनांक १३ मार्च २०१५ मधील अधिसुचना अन्वये सुट देण्यात आली आहे.

अनुसुची पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ) प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम :- प्रशासक नियुक्तीची आवश्यकता नाही

(ब) प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता :- निरंक

(क) ज्या अधिसुचनेव्दारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशिल :- निरंक

टिप - उक्त जमिनीच्या आराखडयाचे भूसंपादन अधिकारी अ.व.प्र.क्र. ४ अमरावती यांच्या कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक :- ४/०९/२०१९

ठिकाण :- अमरावती

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
अ.व.प्र.क्र.४ अमरावती

(शैलेश नवाल)
जिल्हाधिकारी, अमरावती